**L. A. BILL No. VI OF 2022.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५९ चा ३. **(विधानसभेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह समंत केल्याप्रमाणे.)**

१९६२ चा महा. ५. **(विधानपरिषदेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह समंत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण-एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

प्रकरण-दोन

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मधील, "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५९ चा ३.

प्रकरण-तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा. **३.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मधील, "राज्य निवडणूक आयोग" या मजकुराऐवजी, "राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२ ची सुधारणा. **४.** जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "राज्य निवडणूक आयोग" या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५८ ची सुधारणा. **५.** जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मधील, "राज्य निवडणूक आयोगाकडून" या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासनाकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण-चार

## संकीर्ण

१९५९ चा ३. २०२२ चा महा. **६.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम आणि त्याखालील केलेले नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२२ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, राज्य निवडणूक आयोगाने,— प्रभागांची, निवडणूक विभागांची व निर्वाचक गणांची विभागणी रद्द करणे.

(एक) गावाची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची आणि प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाच्या पंचायत सदस्यांची संख्या निर्धारित करण्याची ;

(दोन) जिल्ह्याची निवडणूक विभागांमध्ये विभागणी करण्याची आणि प्रत्येक निवडणूक विभागामधून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निर्धारित करण्याची ; किंवा

(तीन) निवडणूक विभागाची निर्वाचक गणांमध्ये विभागणी करण्याची,

प्रक्रिया सुरू केलेली असेल किंवा पूर्ण केली असेल तेव्हा, अशी प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ; आणि प्रभागांची, निवडणूक विभागांची किंवा निर्वाचक गणांची विभागणी करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक प्रभागातून किंवा निवडणूक विभागातून निवडून द्यावयाच्या पंचायतीच्या सदस्यांच्या किंवा जिल्हा परिषदेच्या १९५९ चा ३. सदस्यांच्या संख्येचे निर्धारण, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम यांच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

## **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६. ]**

**[ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. हसन मुश्रीफ,**
ग्रामविकास मंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह समंत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह समंत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई